# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०१७
## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगतर्फे दि.१० डिसेंबर, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०१७ च्या एकूण १०७ पदांचा निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मुळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधिन राहुन दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** सदर परीक्षेमध्ये सांगली या जिल्हयातील श्री.नेर्लेकर पवन विलास, बैठक क्रमांक MB003087 हे राज्यातून व मागासवर्गवारीतून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून नागपूर या जिल्हयातील श्रीमती.आखरे पल्लवी प्रदीपराव, बैठक क्रमांक MB001455 हया राज्यात प्रथम आल्या आहेत.

**३.** उमेवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण ( cut off marks ) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**४.** सहायक कक्ष अधिकारी / विक्रीकर निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक संयुक्त (पूर्व) परीक्षेकरिता ३,३०,९०९ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षेमधून सहायक कक्ष अधिकारी मुख्य परीक्षेकरिता २१७६ उमेदवार अर्हताप्राप्त ठरले होते. प्रस्तुत मुख्य परीक्षा दि.१० डिसेंबर, २०१७ रोजी मुंबई केंद्रावर घेण्यात आली होती.

**५.** अर्जात प्राविण्य प्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-ब (अराजपत्रित) पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १६ मे, २०१७ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र व मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचा म्हणजेच दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजीचा किंवा तत्पूर्वीचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहिल.

**६.** प्रस्तुत अंतिम निकालात शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे. अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईल मध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक ३.८ पहावे)

दिनांक : २१ एप्रिल, २०१८
ठिकाण : मुंबई

**विजया पडते**
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग